| | |
|---|---|
| महाराष्ट्र राज्य | Maharashtra State |
| माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, | Secondary & Higher Secondary Education, |
| नाशिक विभागीय मंडळ, सर्व्हे नं.१५६०/१ | Nashik Divisional Board, Serve No.1560/1 |
| आडगांव शिवार,आडगांव नाशिक–४२२००३ | Adgaon Shivar, Adgaon, Nashik-422003. |

गट/सर्वे नं. १५६०/१ अडगांव शिवार, न्यू इंग्लिश स्कूल जवळ, मुबई आग्रा रोड, आडगांव, नाशिक

Website-sscboardnashik.com Telephone :0253 2945241, 2945251 Email-nsksec@rediffmail.com


## खाजगी विद्यार्थ्यांनी नांव नोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्यासाठी मान्यता प्राप्त सर्व माध्यमिक शाळांना सूचना

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ.१० वी) जून–जुलै २०२६ परीक्षेस शाळाबाहय व खाजगी विद्यार्थ्यांची (फॉर्म नं.१७) ऑनलाईन नांव नोंदणी दिनांक २२/०४/२०२६ पासून सुरू करण्यात येत आहे.

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ.१०वी) परीक्षेसाठी खाजगीरीत्या प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मार्च २०२४ परीक्षेपासून संपर्क केंद्र बंद करून सर्व माध्यमिक शाळांमधून फॉर्म भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. तरी इ. १०वी परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थ्यांकरिता सर्व माध्यमिक शाळा मंडळाच्या अटी–शर्तीनुसार नांवनोंदणी करण्याकरिता उपलब्ध आहेत.

सबब सर्व माध्यमिक शाळांनी याची नोंद घेवून शिक्षण प्रवाहाच्या बाहेर राहिलेल्या परंतू किमान इ. ५ वी उत्तीर्ण असलेल्या व दिनांक ३१ जुलै, २०२५ रोजी वयाची १४ वर्ष पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ. १०वी) परीक्षेस प्रविष्ट होवून शिक्षण प्रवाहात येण्याची संधी उपलब्ध करून द्यावी. या संदर्भातील सर्व माहिती व मार्गदर्शक सूचना मंडळाच्या **http://www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहेत.

०१. माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ.१०वी) जून–जुलै २०२६ परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन स्विकारण्याच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

| अ.क्र | तपशिल | नावनोंदणी अर्ज ऑनलाईन स्विकारण्यासाठी तारखा |
|---|---|---|
| १ | विद्यार्थ्यांनी नांवनोंदणी अर्ज व नियमित शुल्क ऑनलाईन भरून अर्जाची प्रत (print out) ऑनलाईन नावनोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोचपावतीची प्रिंट आऊट व मूळ कागदपत्रे अर्जावर नमूद केलेल्या शाळेत जमा करणे. | बुधवार दि. २२/०४/२०२६ ते गुरूवार दि. २१/०५/२०२६ |

०२. खाजगी विद्यार्थ्यांनी इ.१० वी साठी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरावयाचे आहेत. त्यामुळे कोणाचाही ऑफलाईन अर्ज स्विकारला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

०३. खाजगी विद्यार्थ्यांनी इ.१० वी साठी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन भरण्यापूर्वी ज्या शाळेतून मंडळाची परीक्षा द्यावयाची आहे, त्या शाळेत जाऊन शाळेचा सांकेतांक, विषय योजना, माध्यम व इतर आवश्यक माहिती घेवूनच नावनोंदणी करावी.

०४. इ.१० वी च्या परीक्षेसाठी नावनोंदणी अर्ज सादर करतांना विद्यार्थ्यांनी **http://www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावरील **student corner** या **option** चा वापर करावा, अर्ज भरण्यासाठीच्या सूचना संकेतस्थळावर उपलब्ध आहेत, त्या वाचून अर्ज भरण्यास सुरवात करावी.

०५. विद्यार्थ्याने अर्ज भरण्याकरीता १) शाळा सोडल्याचा दाखला (मूळ प्रत), नसल्यास व्दितीय प्रत (मूळ प्रत) व प्रतिज्ञा पत्र २) आधारकार्ड ३) स्वत:चा पासपोर्ट आकाराचा फोटो स्वत: जवळ ठेवावा. ऑनलाईन अर्ज भरतांना सदर मूळ कागदपत्रे स्कॅन करून अपलोड करावयाची आहेत. काही कारणास्तव विद्यार्थ्यांकडे दुय्यम शाळा सोडल्याचा दाखला असेल तर त्याची मूळप्रत जोडणे आवश्यक आहे.

०६. कागदपत्रे स्कॅन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्कॅनर/मोबाईलव्दारे कागदपत्रांचे फोटो (PDF) काढून ते अपलोड करावे. विद्यार्थ्यांचा मोबाईल क्रमांक व ई–मेल आय.डी पुढील संपर्कासाठी अनिवार्य आहे.

०७. संपूर्ण अर्ज भरून झाल्यावर अर्जाबाबतची संपूर्ण माहिती तसेच त्याने **upload** केलेली सर्व मूळ कागदपत्रे त्याच्या **Login** मध्ये उपलब्ध राहतील. सदर अर्जाची प्रत (**Print out**) विद्यार्थ्यांना त्यांनी नमूद केलेल्या ई–मेल आयडीवर पाठविली जाणार आहेत. तसेच विद्यार्थ्यांनी या संपूर्ण भरलेल्या अर्जाची प्रिंट आऊट, ऑनलाईन नोंदणीशुल्क भरल्याची पावती व हमीपत्र यासह दोन प्रतीत (**print out**) काढून घ्यावीत.

Scanned with OKEN Scanner

०८. विद्यार्थ्यांनी अर्ज, ऑनलाईन नावनोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोचपावतीची प्रिंटआऊट व मूळ कागदपत्रे नावनोंदणी अर्जावर नमूद केलेल्या माध्यमिक शाळेत विहित मुदतीत जमा करावयाची आहे.

०९. खाजगी विद्यार्थी नावनोंदणी शुल्काचा तपशिल खालीलप्रमाणे—

रू.१११०/— नाव नोंदणी शुल्क + रू.१००/— प्रक्रिया शुल्क (**Processing Fee**)

१०. संबधित शाळेने ऑनलाईन प्राप्त झालेल्या अर्जातील माहिती तसेच **upload** केलेल्या सर्व मूळ कागदपत्रांच्या प्रती शाळेत जमा असल्याबाबतची खात्री करावी व त्याची पडताळणी करून माहिती/कागदपत्रे अपूर्ण असल्यास सदर अर्ज “अपूर्ण” ( **Incomplete**) या प्रकारे नोंदवून विद्यार्थ्यांकडे त्रुटी पूर्ततेसाठी पाठवावयाचे आहेत. तसेच इतर परिपूर्ण अर्ज व कागदपत्रे विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पाठवावयाचे आहेत व मूळ कागदपत्र शाळेमध्ये ठेवावयाचे आहेत.

११. सदरील काम करणाऱ्या शाळेतील मुख्याध्यापक/जेष्ठ शिक्षक व लिपिक यांना या कामाबाबत पुढील दराने मानधन देण्यात यावे.

अ) मुख्याध्यापक तथा जेष्ठ शिक्षक—

| | |
|---|---|
| १) १० विद्यार्थ्यांपर्यंत | रू. १५०/— |
| २) १० पेक्षा जास्त विद्यार्थी | रू. १५०/— + १०/— प्रति विद्यार्थी |
| ३) जास्तीत जास्त | रू. ५००/— |

ब) लिपिक —

| | |
|---|---|
| १) १० विद्यार्थ्यांपर्यत | रू. १००/— |
| २) १० पेक्षा जास्त विद्यार्थी | रू. १००/— + १०/— प्रति विद्यार्थी |
| ३) जास्तीत जास्त | रू. २००/— |

१२. माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खाजगी विद्यार्थ्यांची नावनोंदणी ऑनलाईन पध्दतीने होणार असून नावनोंदणी करतांना विद्यार्थ्यांच्या सध्याच्या पत्त्यातील (**Current Address**) जिल्हा, तालुका व त्याने निवडलेल्या माध्यमानुसार त्यास माध्यमिक शाळांची यादी दिसेल त्यामधील एका माध्यमिक शाळेची निवड विद्यार्थ्याने करावयाची आहे. या माध्यमिक शाळेने विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज, प्रकल्प अंतर्गत मूल्यमापन, प्रात्यक्षिक/तोंडी, श्रेणी विषय संदर्भातील कामकाज व अनुषंगिक मूल्यमापन तसेच या संदर्भातील गुण **online** नोंदवून मंडळाकडे विहीत मुदतीत पाठवावयाचे आहेत व सदरचे गुणतक्ते प्रचलित पृध्दतीप्रमाणे सिलबंद पाकिटात, पाकिटावर माध्यमिक शाळेचे नांव, सांकेतांक क्रमांक (**Index No**) टाकून मंडळाकडे जमा करावयाचे आहेत.

१३. एखादा विद्यार्थी कागदपत्रांअभावी अपात्र ठरल्यास त्या विद्यार्थ्याकडून संबंधित कागदपत्रांची पूर्तता करून घेवून अंतिम कार्यवाही करावी. सदर अपात्र विद्यार्थ्यास प्रक्रिया शुल्काचे रू.१००/—(अक्षरी रूपये शंभर) वगळून उर्वरीत रक्कम यथावकाश परत करण्यात येईल.

१४. स्वाध्याय पुस्तिका ऑनलाईन पध्दतीने मंडळाच्या संकेतस्थळावर सरावासाठी इंग्रजी, मराठी, हिंदी व उर्दू माध्यमात उपलब्ध होतील. याबाबत संबंधित विद्यार्थ्यांना शाळेचे मुख्याध्यापक/विषय शिक्षकांकडूनच सूचना देण्यात याव्यात तसेच मार्गदर्शन करण्यात यावे. स्वाध्याय पुस्तिका ऑफलाईन पध्दतीने देण्यात येणार नसल्याने स्वाध्याय पुस्तिका सोडवून त्या तपासणे व त्याचे गुण कळविणे ही पध्दत बंद करून नियमित विद्यार्थ्यांप्रमाणे खाजगी विद्यार्थ्यांची तोंडी, प्रात्यक्षिक, श्रेणी व अंतर्गत मूल्यमापनाची परीक्षा घेवून या परीक्षेचे गुण **online** पध्दतीने नोंदवून विहित मुदतीत मंडळाकडे सादर करावे.

१५. शाळा सोडल्याचा दिनांक व दाखला दिल्याचा दिनांक याबाबत पात्रतेसाठी शाळा सोडल्याचा दिनांक ग्राह्य धरण्यात येईल. दिनांक ३१ ऑगस्ट २०२५ पूर्वी विद्यार्थ्याचा शाळा सोडल्याचा दाखला असणे आवश्यक आहे.

१६. इ. १० वी जून—जुलै २०२६ परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थी (फॉर्म नं.१७) नावनोंदणी शुल्क ऑनलाईन पध्दतीने (**Debit Card/Credit Card/UPI/Net banking**) व्दारे भरणे अनिवार्य राहील. ऑनलाईन पध्दतीने शुल्क जमा केलेबाबतची पोचपावती विद्यार्थ्याला/संबंधित शाळेस त्यांच्या **Login** मध्ये प्राप्त होईल.

१७. एकदा नावनोंदणी अर्ज शाळेला ऑनलाईन सादर केल्यानंतर कुठल्याही स्तरावर त्रुटी पुर्ततेसाठी सदर अर्ज विद्यार्थ्यास प्राप्त झाल्यास विद्यार्थ्याला त्याचे नाव, सध्याचा पत्ता (**Currnt Address**), माध्यम व शाळा यामध्ये कुठलाही बदल करता येणार नाही. त्यामुळे शाळा प्रमुखांनी विद्यार्थ्यास शाळा सोडल्याच्या मूळ दाखल्यावरील माहितीप्रमाणे ऑनलाईन नावनोंदणी अर्ज भरणेबाबत स्पष्ट सूचना देण्यात याव्यात.

..३..

Scanned with OKEN Scanner

१८.दिव्यांग विद्यार्थ्यांना खाजगीरित्या प्रविष्ठ व्हावयाचे असेल तर त्यांनी त्यांच्या दिव्यांगत्वाचे जिल्हा शल्य चिकित्सकांनी प्राधिकृत केलेल्या रूग्णालयाच्या/वैद्यकीय मंडळाच्या प्रमाणपत्राची/UDID Card ची छायाप्रत प्रमाणित करून अर्जासोबत सादर करावी. दिव्यांग विद्यार्थ्यांना विषय योजना तसेच परीक्षेसाठी असलेल्या सवलती याबाबत मार्गदर्शन करण्यात यावे.

१९. महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळामार्फत इ.५ वी किंवा इ.८ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना इ.१० वी साठी खाजगी विद्यार्थी ( १७ नंबर) म्हणून नांवनोंदणी करता येईल.

२०. पात्र (Eligible) विद्यार्थ्यांना नांवनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्यांनी परीक्षेची आवेदनपत्रे मंडळाने विहित केलेल्या कालावधीत परीक्षा शुल्कासह त्याच शाळेतून भरणे आवश्यक असल्याबाबतची सूचना विद्यार्थ्यांना देण्यात यावी. तसेच परीक्षेचे आवेदपत्र भरल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांची मूळ कागदपत्रे आपल्या स्तरावरून परत करण्यात यावीत.

२१.*विद्यार्थ्याने खाजगी विद्यार्थी म्हणून ज्या शाळेतून नाव नोंदणी केली आहे त्याच शाळेतून परीक्षेचे आवेदनपत्र भरणे बंधनकारक आहे. एखाद्या शाळेने परीक्षेचे आवेदनपत्र भरून घेण्यास नकार दिल्यास सदर शाळेचा मंडळ सांकेतांक गोठविण्यात येईल याची गांभिर्यपूर्वक नोंद घ्यावी.*

२२. *माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेसाठी प्रत्येक शाळेने आपल्याच शाळेतील माजी विद्यार्थी, आपल्या गावातील विद्यार्थी किंवा सध्याच्या पत्त्यानुसार नजीकच्या परीसरातील विद्यार्थी यांचेच नांवनोंदणी अर्ज प्रवेशित क्षमतेच्या मर्यादेत (५० विद्यार्थी ) स्विकारावेत. तसेच ज्या शाळा आपल्या माजी विद्यार्थ्यांचे नाव नोंदणी अर्ज (फॉर्म नं.१७) स्विकारीत नाहीत अशा शाळांची तक्रार प्राप्त झाल्यास त्या शाळेविरूध्द कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.*

२३. प्रथम नावनोंदणी अर्ज केलेल्या ५० विद्यार्थी क्षमतेपेक्षा जास्त म्हणजे ५१ ते १०० विद्यार्थी वाढीव क्षमतेसाठी संबंधित माध्यमिक शाळांनी मंडळाची लेखी पूर्व परवानगी घेणे अनिवार्य राहील. तद्नंतर वाढीव क्षमता मान्य करण्यात येईल, सदरची ही वाढीव क्षमता ही परीक्षेसाठीच मर्यादित राहील.यानंतर विद्यार्थी क्षमता वाढणार नाही, याची सर्व शाळाप्रमुखांनी नोंद घ्यावी.

23/4

(डॉ. मच्छिंद्रनाथ कदम)
विभागीय सचिव
महाराष्ट्र राज्य माध्य.व उच्च माध्य.
शिक्षण मंडळ, नाशिक विभागीय मंडळ,
नाशिक ४२२ ००३.

क्र.नाविमं/माध्य ब—३/खा.वि/ 370
नाशिक—४२२००३
दि. २३/०४/२०२६

प्रत माहितीस्तव:—

४. मा.सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, राज्यमंडळ, पुणे—०४.
५. मा.शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक
६. शिक्षणाधिकारी (माध्य), नाशिक , धुळे , जळगांव व नंदुरबार

Scanned with OKEN Scanner